# गोवा फाऊंडेशन

म्हापसा, गोवा.

प्रेस विज्ञप्ती

***बेकायदेशीर खाणींची समस्या खाणमालक आणि खाणकंपन्यांची***

***गोव्याला देण असल्याने खाणी बंद झाल्यास जबाबदारी त्यांचीच***

शहा कमीशनच्या गोवा भेटीनंतर गोव्यातल्या खाण उद्योगाबद्दल खाणमालक, ट्रक चालक संघटनां, राजकीय आणि गैर राजकीय संघटनां इत्यादींमध्ये गोव्यातल्या खाणसमस्येबद्दल एकवाक्यता झालेली दिसून येते. गोव्यात बेकायदेशीर खाणींवर बंदी आणून कायदेशीर आणि पर्यावरणाचा विध्वंस न करणाऱ्या खाणी सुरूच राहाव्यात असा एकूण सूर ऐकू येतोय.

मात्र बेकायदेशीर खाणींचा आवाका इतका प्रचंड मोठा आहे की शहा आयोगाच्या अहवालानंतर कायद्याची अंमलबजावणी करायचं ठरवलंच तर तर अनेक चालू खाणींवर बंदीची कुऱ्हाड कोसळेल हे निश्चित.

जनतेची ही भीती सार्थच म्हटली पाहिजे. गेल्या काही आठवड्यात गोवा प्रदुषण मंडळाने सुमारे ४५ खाणींच काम बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत. ह्या खाणी विनापरवाना सुरू असल्याचे सिद्ध झाले आहे. त्या शिवाय नुकत्याच दिलेल्या हायकोर्टाच्या निवाड्यानुसार इतर ४५ खाणींवर कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल खाण बंद का करू नये ह्याची 'कारणे दाखवा' नोटीसही बजावली गेली आहे.

ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर गोव्याच्या सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात फार मोठी खळबळ उडणार हे निश्चित. खाणी बंद केल्यातर उदरभरण करणाऱ्या हजारो खाणकामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळू शकते ह्याचा अंदाज कोणालाही येईल.

ह्या सार्वजनिक जिव्हाळ्याच्या विषयावर गोवा फाऊंडेशन सामान्य गोवेकरांच्या माहितीसाठी काही महत्त्वाची तथ्ये नमूद करू इच्छितं आणि खाणी बंद झाल्याच तर ह्या परिस्थितीचा सामना कसा करायचा ह्याबद्दल फाऊंडेशन काही सूचनाही करू इच्छिते.

**तथ्य क्र.१-** गोव्यातल्या बहुतांश खाणकंपन्यांनी नेमून दिलेल्या मात्रेच्या कितीतरी अधिक पटीने खनीज मालाचे उत्खनन केल्याचे सर्वोतोपरी सिद्ध झालेले आहे. प्रत्येक खाणीने नेमके किती टन खनीजाचे उत्खनन करावे ह्याबद्दल कायदेशीर निर्देश असून सुद्धा प्रत्येक कंपनीने हे निर्देश जाणीवपूर्वक मोडलेले आहेत. ह्याचे एकमेव कारण खाणमालकांना सुटलेली खायखाय. खाण मालक गोवा लुटत असताना जनहिताची जबाबदारी पार न पाडता सरकार जाणीवपूर्वक निमूटपणे बसून होते.

**तथ्य क्र.२-** गोव्याच्या खाणउद्योगात सर्वाधिक गुंतवणूक ही खाणकंपन्यांनी केलेली नसून ती ट्रक्स आणि बार्ज मालकांच्या वतीने झालेली आहे. ह्या संबंधी खाणमालकांच्या गुंतवणूकीचा एकूण आकडा हा ६६२ कोटी इतका आहे. अनेक खाणकंपन्यांनी तर त्यांच्या खाणींसाठी आवश्यक असलेल्या यंत्रसामुग्रीत सुद्धा

गुंतवणूक केलेली नाही. ह्या बाबतीत 'गोवा मायनिंग मशिनरी ओनर्स असोसिएशन' आणि काही व्यक्तींनी पैसे पुरवले आहेत. गंमत म्हणजे गोव्याच्या खाण उद्योगात ट्रक्स आणि बार्ज चालकांची फार मोठी गुंतवणूक केली असून तिचा आकडा २,२०० कोटी रुपये इतका मोठा आहे. ह्याचाच अर्थ खाण उद्योगात गैर खाण उद्योगांनेच जबरदस्त गुंतवणूक केल्याचं सिद्ध होतं.

**तथ्य क्र.३-** ज्या ट्रक्स आणि बार्जेस मालकांनी खाणव्यवसायात गुतवणूक ती त्यांनी खाणमालकांच्या सांगण्यावरूनच केली आहे. आपला खाणव्यवसाय पूर्णपणे कायदेशीर आहे असे आश्वासन खाणमालकांने ट्रक्स आणि बार्जेसवाल्यांना दिल्यानंतरच ह्या मंडळीने खाणव्यवसायात पैसा गुंतवलेला आहे त्यामुळे उद्या जर खाणी बंद झाल्याच तर त्याचे परिणाम बेकायदशीर खनन करणाऱ्या मालकांनी भोगावेत. खाणी बंद झाल्यांनतर होणाऱ्या नुकसानाची पूर्ण जबाबदारी खाणमालकांची असेल, इतर कोणाचीही नसेल.

**तथ्य क्र.४-** चीनमध्ये निकृष्ट खनिजापासून पोलाद निर्माण करण्याच्या तंत्रज्ञानामुळे गोव्यातल्या निकृष्ट मालाला अचानक किंमत आली आणि स्थानिक खाणकंपन्यांनी खनिजाचे बेकायदेशीर उत्खनन करण्याचा झपाटा लावला. त्यामुळे गोव्यातल्या नद्या, तळी, शेती, रस्ते आणि पूल इत्यादी नैसर्गिक आणि शासकीय संपत्तींवर प्रचंड ताण आला. गेल्या सहा वर्षात बेकायदेशीर खाणींनी गोव्यात घातलेल्या धिंगाण्यामुळे गोव्यातल्या नैसर्गिक संपत्तीचे अतोनात नुकसान झाले आहे. खाणीमुळे गावोगावी फफ्फसांचे विकार

बळावले तसेच लोकांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सुद्धा नष्ट झाले. ह्या सगळ्या नुकसानाची भरपाई खाणमालकांनीच दिली पाहिजे. त्यांनी जर गोव्याला लुटले नसते तर गोव्यातल्या सार्वजनिक स्वास्थ्याच्या समस्येने इतका भीषण अवतार धारण केला नसता त्यामुळे खाणी बंद झाल्यानंतर येणाऱ्या बेकारीची संपूर्ण जबाबदारी ही खाणमालकांची आहे, इतर कोणाचीही नाही. बेकायदेशी खाणींवर बंदी आल्यानंतर ज्या कामगारांच्या नोकऱ्या जातील त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी तसेच त्यांना पर्यायी काम देण्याची संपूर्ण जबाबदारी ही खाणमालकांची आहे. शेती, मासेमारी, हस्तोद्योग इत्यादी पारंपरिक व्यवसाय सोडून खाणमजूर म्हणून कामाला लागलेल्या पारंपरिक कारागिरांचे पुनर्वसन करण्याची योजना खाणमालकांनी आखणे आवश्यक आहे.

**तथ्य क्र.५-** राज्यातल्या खनीजसंपत्तीवर राज्यसरकारचाच मालकीहक्क असतो. सामान्य नागरिकांच्या वतीने ह्या नैसर्गिक संपत्तीचे विश्वस्त म्हणून गोवा शासनावर खनीज संपत्तीचे संरक्षण करण्याची जबाबदारी आहे. बेकायदेशीर उत्खनन हे दुसरेतिसरे काहीही नसून खनीजाची दिवसाढवळ्या केलेली चोरी आहे. गेल्या दहावर्षांत सुमारे २५००० कोटींचे बेकायदेशीर खाणकाम झाले आहे. सरळ सरळ हिशोब केला तर सुमारे चौदा लाख लोकसंख्या असलेल्या गोव्याच्या प्रत्येक नागरिकाचे अंदाचे १,७१,५०० रुपये चोरले गेले आहेत. ते खाणमालकांने चोरलेले आहेत. ही आकडेवारी शासकीय स्रोतांवर आधारलेली आहे.

**गोवा फाऊंडेशनच्या सूचना:**

एकूण तथ्यांचा विचार करता गोव्यातल्या खाणमालकांना तसेच लीज मालकांना त्यांची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी झटकून टाकता येणार नाही. म्हणून त्यांनी:

१) आपल्या बंद झालेल्या खाणींवर किमान एक वर्षासाठी बेकार मजुरांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम हाती घ्यावा.

२) ज्यांनी ट्रक्स, बार्जेस इत्यादी विकत घेण्यासाठी बँकांकडून कर्ज घेतले त्या कर्जाचा हप्ता भरावा.

३) बेकायदेशीर खाणींमुळे झालेले पर्यावरणाचे नुकसान भरून काढण्यासाठी स्वतःच्या खिशातून गुंतवणूक करावी.

सरकारने खाणमालकांवर तसेच लीजधारकांवर वरील तीन मार्गांचा अवलंब करण्याचे बंधन घातल्यास बंद होणाऱ्या खाणींवरच्या मजुरांचे पुनर्वसन होईल आणि त्यांना नवं जीवन सुरू करण्यासाठी पुरेसा वेळ व संधी मिळेल. खाणमालकांच्या तसेच लीजधारकांच्या बदमाशीची शिक्षा गोव्यातल्या सामान्य नागरिकानी का बरं भोगावी? गोव्याच्या खनीज संपत्तीची लूट करून खाणमालकांनी माया जमवली. गोव्यातल्या सामान्य जनतेने ह्या पापात का भागिदारी घ्यावी? हा स्वाभाविक प्रश्न प्रत्येक नागरिकाने भ्रष्ट खाणमालकांना तसेच लीज धारकांना विचारावा.

खाणमालकांच्या तसेच लीजधारकांच्या ह्या दरोडेखोरीची धडधडीत उदाहरणं खाली दिलेली आहेत. ही आकडेवारी शासकीय असून पूर्ण विश्वसनीय आहे.

**पहिले उदाहरण :-** २०१०-२०११ ह्या सालात गोव्यातून एकुण ५५ दशलक्ष टन खनीजाची निर्यात झाली. ह्यातून एकूण २२,६१२ कोटीचे उत्पन्न झाले. हा अमाप पैसा गोव्यातल्या केवळ पाच ते सहा खाण कंपन्यांच्या घशात गेला आहे. सेसा गोवा, फोमेंतो, तिंबलो इंडस्ट्रीज, चौगुले आणि साळगावकर खाण कंपन्यांने स्वतःचे उखळ पांढरे करून घेतले. त्याच सोबत दिनार तारकर, जोकिम आलेमाव, सुभाष शिरोडकर, इम्रान खान ह्या कंत्राटदारांनी सुद्धा डल्ला मारलेला आहे.

**दुसरे उदाहरण:-** सेसा गोवाच्या वार्षिक अहवालानुसार २०१०-२०११ साली कंपनीने एकूण २०.४० दशलक्ष किंमतीचे खनीज विकले. आणि त्यातून ८,३८७ कोटी रुपये कमावले. ह्याचाच अर्थ एकूण निर्यातीच्या एक तृतियांश खनीज एकट्या सेसानेच परदेशी विकले. ह्यातून कंपनीने शुद्ध नफ्याच्या स्वरुपात सुमारे ४,२२२ कोटी कमावले आहेत. ह्याच वर्षात गोवा सरकारचे एकूण उत्पन्न ४,२९० कोटी आहे ह्याची नोंद घेणे आवश्यक आहे. सेसाचे मालक आणि चेअरमन अनील अग्रवाल हे लंडन येथे राहात असून गोव्याच्या पर्यावरण समस्येशी तसेच इथल्या गोरगरीबांच्या बेकारीचे त्यांना काहीच देणे घेणे नाही.

**उदाहरण तिसरे:-** २०१०-२०११ साली गोवा सरकारने खाण उद्योगातून मिळणाऱ्या रॉयल्टीमधून सुमारे ९०० कोटी रुपये प्राप्त केले आहेत. खाण उद्योगाची व्यावसायीक गुंतवणूक केवळ ६६२ कोटी रुपयांची आहे. २००७ सालापासून ह्या पैकी अनेक खाणकंपन्यांची लीज संपुष्टात आली आहे. राज्यातली एकूण खनीज संपत्ती सरकारी मालकीची असल्याने गोवा सरकारने सगळ्या खाणव्यवसायाचे राष्ट्रीयकरण करणे हितावह ठरेल. ह्यामुळे राज्य सरकारचे उत्पन्न दुप्पट होईल आणि त्यामुळे राज्यात उत्तम रस्ते, पाणी आणि वीज पुरवठा, वैद्यकीय विमा, रोजगार हमी योजना, खाण मजुरांच्या पुनर्वसनाचे विविध कार्यक्रम, लघु आणि कुटीर उद्योगांसाठी पतपुरवठा तसेच गोव्यातील नवविवाहित दांपत्यांसाठी स्वतःचे घर बांधण्यासाठी पैसा दिला जाऊ शकतो.

**तात्पर्य:-** गोव्याने किती दशलक्ष टन खनीज निर्यात करावे हा निर्णय सरकारी अखत्यारीत येतो. त्यात गोवा फाऊंडेशनला भूमिका नाही. मात्र वर सांगितलेल्या आर्थिक उलाढालींमधून गोव्याच्या सार्वजनिक नैसर्गिक संपत्तीचे कसे आणि कोणी हरण केले हे व्यवस्थित सिद्ध होते. बेकायदेशीर खाणव्यवसायातून जमा केलेली माया भारतीय आणि स्वीस बँकांमध्ये जमा करून खाणमालक, राजकीय नेते तसेच लीज मालकांनी गरीब मजूरांना देशोधडीला लावण्याचा चंग बांधलेला दिसून येतो.

गोवा आणि गोव्यातला खाण उद्योग दोन्ही एकत्र तगू शकणार नाही ही गोवा फाऊंडेशनची भूमिका आहे. त्या भूमिकेला वैज्ञानिक तथ्यांचा भक्कम आधार आह. दरवर्षी जर गोव्याने ५५ दशलक्ष टन खनीज निर्यात करण्याचा झपाटा सुरू ठेवला तर येत्या पाच वर्षांमध्ये गोव्याचा संपूर्ण सत्यानाश होईल आणि गोव्यातल्या पर्यटन व्यवसायाला सुद्धा टाळे ठोकावे लागेल. हे सत्य गोव्यातल्या प्रत्येक सुजाण नागरिकाने ओळखावे. आज गोव्याच्या खाणउद्योगात जे घडतंय त्याची संपूर्ण जबाबदारी खाणउद्योजकांचीच आहे. इतर कोणाचीही नाही. गोव्याच्या नैसर्गिक संसाधनांचे अनैतिक शोषण करून गब्बर झालेल्या खाणमालकांनी तसेच लीज धारकांनी ह्या बाबतीत इतर कोणालाही दोष देऊ नये असे गोवा फाऊंडेशनचे म्हणणे आहे. प्रत्यक नागरिकाने हे सत्य ओळखावे.

**डॉ. क्लॉड अल्वारीस,**
गोवा फाऊंडेशन.
२३ नोव्हेंबर २०११